# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-06.06.2026** **वार- शनिवार**

---

**<u>शिवराज्याभिषेक दिन</u>**

राज्यात सर्वत्र शिवराज्याभिषेक दिन आज उत्साहात साजरा करण्यात आला. रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील किल्ले रायगडावर 353 वा शिवराज्याभिषेक सोहळा युवराज संभाजीराजे छत्रपती आणि शहाजीराजे छत्रपती यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी हजारो शिवभक्त उपस्थित होते. राजसदरेवर महाराजांच्या उत्सव मूर्तीस विधिवत अभिषेक केल्यानंतर, सिंहासनारूढ शिवपुतळ्यावर सुवर्ण मुद्रांचा अभिषेक करण्यात आला.
सोलापुरात जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं.

तर कोल्हापुरमध्ये शिवाजी विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला विद्यापीठाचा छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील 2 क्रेडिटचा ऑनलाईन अभ्यासक्रम अनिवार्य आणि मोफत करणार असल्याची घोषणा कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी शिवराज्याभिषेक दिनानिमित केली.
पालघर जिल्हा परिषद परिसरात शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शिवस्वराज्य गुढी उभारण्यात आली. तर सिंधुदुर्ग जिल्हा परिषद इथं आमदार दीपक केसरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवशक राजदंड आणि स्वराज्य गुढीचं विधिवत पूजन करण्यात आलं.
रत्नागिरीत भारतीय जनता पक्षातर्फे रत्नदुर्ग किल्ला आणि श्री भगवती देवी मंदिर परिसरात शिवराज्याभिषेक दिनाचं औचित्य साधून आज स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. परभणी तसंच इतर जिल्ह्यातही शिवराज्याभिषेक दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.

**<u>लाही</u>**

विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान न देता त्यांच्यात कौशल्य, आत्मविश्वास आणि करिअरविषयक स्पष्टता निर्माण करण्यासाठी गेली दोन दशकं कार्यरत असलेल्या लाही अर्थात 'लेंड अ हॅण्ड इंडिया' या संस्थेच्या कार्याचा गौरव सोहळा येत्या मंगळवारी सायंकाळी साडे पाच वाजता पुणे इंटरनॅशनल सेंटर इथं आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्राचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम आणि उद्योजक प्रतापराव पवार यांची गौरव सोहळ्याला प्रमुख उपस्थिती असेल, अशी माहिती संस्थेच्या संस्थापक सुनंदा माने आणि राज गिल्डा यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

**<u>महिला-कारागृह-मिलिंद-भोई</u>**

गेल्या काही वर्षांमध्ये कारागृह ही सुधारगृह होत असून महाराष्ट्र कारागृह प्रशासन, भोई प्रतिष्ठान आणि आदर्श मित्र मंडळ यांनी समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे, त्याची व्यापकता वाढवून राज्यभर त्याचा प्रसार होणं आवश्यक असल्याचं प्रतिपादन राज्यसभेच्या खासदार डॉ. मेधा कुलकर्णी यांनी केलं. महाराष्ट्र कारागृह प्रशासन, भोई प्रतिष्ठान पुणे आणि आदर्श मित्र मंडळ, पुणे यांच्यातर्फे येरवडा महिला कारागृहातील बंदी-भगिनींसाठी पर्यावरण पूरक सॅनिटरी पॅड्स बँक या अभिनव प्रकल्पाचा शुभारंभ खासदार कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला त्याप्रसंगी त्या बोलत होत्या.

अपर पोलीस महासंचालक आणि कारागृह महानिरीक्षक डॉ. सुहास वारके, विशेष कारागृह महानिरीक्षक योगेश देसाई, भोई प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. डॉ. मिलिंद भोई आणि इतर मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.

**रिपाई-ख्रिश्चन-आघाडी**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाच्या वतीनं प्रथमच ख्रिश्चन आघाडीची स्थापना करण्यात आली असून, या आघाडीच्या पुणे शहराध्यक्षपदी ख्रिस्तोपर राजमनी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आलं. पुण्यातील डॉ. मौलाना अबुल कलाम आझाद सभागृहात आयोजित कार्यक्रमात ही नियुक्ती जाहीर करण्यात आली. पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव यांनी, रामदास आठवले यांच्या सूचनेनुसार ही नियुक्ती करण्यात आल्याचं सांगितलं.

**ताथवडे-वनराई-बारणे**

खासदार श्रीरंग बारणे आणि शिवसेना गटनेते विश्वजित बारणे यांच्या सहकार्यातून ताथवडे इथं वनराई उभारण्यात येत आहे. दहा लाख झाडं लावण्याचा संकल्प करण्यात आला असून आतापर्यंत आठ लाख देशी झाडं इथं लावण्यात आली आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात झाडं लावल्यानंतर भविष्यात 65 हजार क्यूसेक कार्बन कमी होईल, असा विश्वास खासदार बारणे यांनी व्यक्त केला. 'ओरिएअर्थ निसर्ग फाउंडेशन'नं पाच वर्षं झाडं जगवण्याची जबाबदारी घेतली असून 'जागतिक पर्यावरण दिना'चं औचित्य साधून शासकीय पशु पैदास प्रक्षेत्र, ताथवडे इथं फाउंडेशनच्या वतीनं आयोजित करण्यात आलेल्या वृक्षारोपण सोहळ्याला खासदार बारणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

**भुयारी मार्ग-बारणे**

देहूरोड निगडी रस्त्यावर केंद्रीय विद्यालय आणि देहूरोड ऑर्डनन्स फॅक्टरी या दरम्यान दोन भुयारी मार्ग मंजूर झाले आहेत. या भुयारी मार्गाचं काम सुरू करण्यासाठी सदन कमांड ब्रिगेडियर आणि कॅन्टोन्मेंट बोर्डानं तत्वतः मान्यता दिली आहे. त्यामुळं अनेक वर्षांपासून रखडलेलं भुयारी मार्गाचं काम सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याचं मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी सांगितलं.

**पुणे हवामान**

पुणे शहर आणि परिसरात आज आकाश अंशतः ढगाळ होतं. तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. शहरात कमाल 38 अंश सेल्सियस तर किमान 25 पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सियस तापमान नोंदवलं गेलं.

## तर हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू ताज्या पुणे वृत्तांतमध्ये उद्या संध्याकाळी सहा वाजता. नमस्कार.